सकाळ

# जनधन खातेदारांनी केवायसी करून घेणे अनिवार्य : सचिन शेंडे

## केवायसी व आर्थिक साक्षरता जनजागृती कार्यक्रम

■ सकाळ वृत्तसेवा

शेगाव, ता. ११ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून जनधन योजने अंतर्गत संपूर्ण देशभरात बँकखाते उघडण्यात आले आहेत. सदर खात्याचे रिझर्व बँकेच्या नियमाप्रमाणे दहा वर्षानंतर केवायसीची प्रक्रिया करावयाची असते, त्यासाठी जनधन योजनेमधील खातेदारांनी आर्थिक साक्षर व सुरक्षिततेसाठी आपली केवायसी करून घेणे अनिवार्य आहे, असे प्रतिपादन रिझर्व बँकेचे निदेशक सचिन शेंडे यांनी केले.

येथील केसरबाई देशमुख सभागृहात भारतीय स्टेट बँक शाखा शेगाव यांच्या पुढाकाराने ता. ८ सप्टेंबर रोजी जनधन खात्यातील केवायसी, आर्थिक साक्षरता व खात्याची सुरक्षितता यासंबंधी जनजागृतीसाठी कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी सहाय्यक महाप्रबंधक स्टेट बँक किस्ले कुमार, क्षेत्रीय प्रबंधक सेंट्रल बँक पंकज कुमार, बुलढाणा डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव बँक सीईओ डॉ. अशोक खरात, केके सिंग आदी मान्यवर, मान्यवर अधिकारी मंचावर उपस्थित होते.



शेगाव : खातेदाराच्या वारसास धनादेश सुपूर्द करताना सचिन शेंडे व अधिकारी.

या कार्यक्रमात जनधन याजनेतील खातेदार यांच्या अपघाती निधनामुळे त्यांचे वारस विजय ओंकार सैरसे यांना प्रति वर्ष २० रुपये प्रमाणे प्रीमियम असलेल्या विमाच्या मोबदल्यात दोन लाख रुपये भरपाई देण्यात आली. कार्यक्रमाचे संचलन शाखा व्यवस्थापक गौरव जामदार, प्रास्ताविक किस्ले कुमार तर आभार प्रदर्शन रोहित गाढे यांनी केले. यावेळी शेगाव शहरातील सर्व राष्ट्रीयकृत बँकांचे अधिकारी कर्मचारी, को-ऑपरेटिव्ह बँकांचे अधिकारी, कर्मचारी व नागरिक, महिला बचत गट, खातेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान येत्या ता. ३० सप्टेंबरपर्यंत शेगाव शाखेतील जनधन खातेदारांनी बँकेशी संपर्क साधून आपली केवायसी पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन शेगाव शाखा व्यवस्थापक गौरव जामदार यांनी केले.